महाराष्ट्र शासन

क्रमांक:शाशिम १०९३/न.क्र.१०८/क्रीयुसे-३,
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक: २३ जुलै, १९९३.

प्रति:
कुल सचिव
अमरावती विद्यापिठ, अमरावती.

विषय: सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून बी.पी.ई
<u>अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता परवानगी देणेबाबत.</u>

महोदय,

सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून शारिरीक शिक्षण महाविद्यालयातील नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता शासनाकडे प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करुन खालील तीन संस्थांना अमरावती विद्यापिठ अधिनियम १९८३ च्या कलम ५१[४९][सी][२]अन्वये सन १९९३-९४ पासून त्या त्या संस्थांच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी बी.पी.ई. अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता व सदर अधिनियमाच्या कलम ५१[५]च्या अनुषंगाने विद्यापिठाकडे प्राप्त झालेल्या अर्जावर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याची विद्यापिठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| | | |
|---|---|---|
| १]हनुमान व्यायाम शाळा क्रीडा मंडळ, यवतमाळचे शारिरीक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ | - | यवतमाळ |
| २]शिवाजी शिक्षण संस्था [illegible] जिल्हा अकोलाचे शारिरीक शिक्षण महाविद्यालय, वाशिम | - | वाशिम |
| ३]सरदार पटेल विद्यामंदिर यवतमाळचे दयाभाई पटेल शारिरीक शिक्षण महाविद्यालय यवतमाळ. | - | यवतमाळ |

२. सदर शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना बी.पी.ई. अभ्यासक्रम राबविण्यासाठी कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यांत येत असून अमरावती विद्यापिठ व संचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी विद्यार्थी संख्येबाबत घातलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे सदरहू महाविद्यालयांवर बंधनकारक राहील.

३. अमरावती विद्यापिठ अधिनियम, १९८३च्या कलम ५१[६]अन्वये अंतिम संलग्नीकरणाचा प्रस्ताव विद्यापिठाकडून प्राप्त झाल्यावर विद्यापिठ अधिनियमांच्या

...२.

कलम ५१[७]अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार संस्थेंची एकूण कार्यपध्दती व प्रगती समाधानकारक असल्याची खात्री झाल्यानंतरच त्या संस्थांचे अंतिम मंजूरीचे शासन निर्णय निर्गमित करण्यांत येतील.

आपला विश्वासू,

[ ग. स. दळवी ]
शासनाचे उप सचिव

प्रत: सचिव, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अध्यक्ष, अनुमान व्यायाम शाळा क्रीडा मंडळ, यवतमाळचे शारिरीक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ.
अध्यक्ष, शिवाजी शिक्षण संस्था वाशिम, जिल्हा अकोलाचे शारिरीक शिक्षण महाविद्यालय, वाशिम.
अध्यक्ष, सरदार पटेल विद्यामंदिर यवतमाळचे दमाभाई पटेल शारिरीक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ.
निवड नस्ती, कार्यासन क्रीयुसे-३.

माराका.